लोकमत

विज्ञान



डॉ. व्ही. एन. शिंदे

# धरणे का फुटतात?



या वर्षी पावसाळा उशिराने सुरु झाला. झालेला विलंब भरुन काढण्यासाठी पडावा तसा तो कोसळायलाही लागला. पावसाचा जोर जास्त आहेच. अनेक ठिकाणी नद्यांना पूर येत आहेत. नद्या दुथडी भरुन वाहताहेत. असे जरासे सुखकर चित्र निर्माण होत असतानाच बातमी आली की, रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील तिवरे धरण फुटले. दुर्घटनेत चोवीस जण बेपत्ता झाले. पहिल्याच दिवशी त्यातील दहा जणांचे मृतदेह सापडले, पुढे आणखी सापडत राहिले. जनावरे, घरे, शेतीची अपरिमित हानी झाली. आर्थिक मदतीच्या घोषणा झाल्या. मात्र, त्यानंतर हे धरण का फुटले, यावरुन उलट-सुलट चर्चेचा फड रंगू लागला. प्रत्येक धरणावर सुरक्षिततेसाठी बसवण्यात आलेल्या उपकरणांच्या स्थितीचा आढावा प्रसिद्ध करण्यात आला. त्यानुसार पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त उपकरणे बंद अवस्थेत असल्याचे समजले. या पार्श्वभूमीवर धरणांचा सर्वांनीच शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे.

मुळात धरणांची निर्मिती होते ती जनतेच्या मागणीवरुन किंवा एखाद्या द्रष्ट्या अधिकाऱ्याने भविष्याचा वेध घेत ठेवलेल्या प्रस्तावावरुन. धरणाच्या बांधाची लांबी जितकी कमी, तितका धरण बांधणीसाठी येणारा खर्च कमी. त्यादृष्टीने धरणांच्या जागांची निवड केली जाते. छोटी धरणे बांधताना ती मातीतील बांधली जातात. धरणे बांधण्यापूर्वी त्या ठिकाणाच्या जमिनीचा परीक्षण केले जाते. जमिनीचा प्रकार अभ्यासून अहवाल तयार केला जातो. त्यासाठी खर्चाचा अंदाज बांधला जातो. टेंडर प्रक्रिया राबवून अनुभवी कंत्राटदाराला काम सोपविले जाते. ज्या ठिकाणी बांध घालून पाणी अडवायचे आहे, ती जागा सर्वांत महत्त्वाची असते. धरणाची उंची, होणारा पाणीसाठा, त्याने व्यापले जाणारे क्षेत्र, पाणीसाठ्याची उंची, त्या भागाची भूकंप प्रवणता या सर्व बाबी अभ्यासल्या जातात. त्यानुसार धरण बांधताना करावयाच्या गोष्टींची परिमाणे, निकष ठरविले जातात.

धरणाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यापूर्वी त्या भागात विविध ठिकाणी छिद्रे पाडून त्या खडकांचा अंदाज घेतला जातो. सच्छिद्र खडक असलेल्या भागात पाझर तलाव बांधला जातो. पाण्याचा साठा हवा असेल तर जमिनीत कठीण खडक असणे अत्यंत आवश्यक असते. प्रत्यक्ष धरण बांधताना बांधाच्या जागेवरील माती कठीण खडकांपर्यंत बाहेर काढली जाते. त्याला पाया घेणे असे म्हणतात. पाया ही बाब अत्यंत महत्त्वाची असते. त्या जागी पाणी पकडून ठेवणारी काळी माती भरली जाते. ही माती भरत असताना वारंवार रोलरच्या सहाय्याने दाबून ती घट्ट बसवली जाते. त्या मातीच्या दोन्ही बाजूंनी मुरुमाचा जाड थर दिला जातो. पाण्याच्या साठ्यात हवेमुळे लाटा निर्माण होतात. लाटांचा मुरुमावर परिणाम होऊ नये म्हणून त्यावर काळ्या कठीण दगडांचा थर बसविला जातो, त्याला पिचिंग करणे म्हणतात. ही दगडे अनेकदा ग्रामस्थांकडून अज्ञानातून मासे आणि खेकडे काढण्यासाठी काढली जातात. पावसाळ्यात पाणी पातळी जास्त खोल असणाऱ्या जागेवरचे असे दगड निघतात. ते पूर्ववत बसवले नाही तर तरी धरणाला धोका निर्माण होतो. धरणे बांधताना त्या ठिकाणी किती पाणलोट क्षेत्र आहे, पाऊस किती पडतो, जास्तीत जास्त पाणी किती येऊ शकते, याचा विचार करुन सांडवा ठेवलेला असतो. धरण भरल्यानंतर येणारे अतिरिक्त पाणी बाहेर जाणे सांडव्यामुळे शक्य होते आणि धरण सुरक्षित राहते.

या सांडव्यात अडथळा येणे झाडे उगवणे, गवत वाढणे, पाणी आणि धरण सुरक्षित राहण्यासाठी बसवलेली दगडे काढणे, बांधकाम करताना काहीतरी चुकीची गोष्ट करणे या बाबी कोणत्याही धरणासाठी धोका निर्माण करतात. माणूस धरणे बांधतो आपल्या सोयीसाठी, त्याची सुरक्षितता सांभाळणे हेही आपले कर्तव्य आहे. धरणाच्या खालच्या भागात पाणी बाहेर पडते. हे पाणी स्वच्छ असेल तर तो पाझर असतो, मात्र, गढूळ पाणी येत असेल तर धरणाच्या रचनेला धोका निर्माण झालेला असतो. हे वेळीच ओळखून उपाययोजना केली तर तिवरेची पुनरावृत्ती निश्चितच टाळता येते.

(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)



सामंजस्य करारप्रसंगी डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी.टी. शिर्के यांच्यासह डॉ. विलास नांदवडेकर आणि अरुण सातपुते. यावेळी डावीकडून व्ही.टी. पाटील, नितीन देसाई, डॉ. ए.एम. गुरव, उपमहापौर भूपाल शेटे, महेश काकडे आदी.

# आधुनिक तंत्रज्ञानाने चप्पल बांधणी

## कोल्हापुरी चप्पल क्लस्टरसोबत विद्यापीठाचा करार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'कोल्हापुरी चप्पल ही कोल्हापूरची ओळख आहे. कोल्हापूरला येणारा पर्यटक कोल्हापुरी चप्पलची खरेदी केल्याशिवाय परत जात नाही. या व्यवसायात पारंपरिक काम करणाऱ्या कारागिरांच्या पुढच्या पिढीनेही ही परंपरा जपायची असेल तर त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्याशिवाय पर्याय नाही. याच दृष्टीकोनातून शिवाजी विद्यापीठातर्फे कोल्हापूर चप्पल क्लस्टरशी केलेल्या सामंजस्य करारातून चप्पल उत्पादनातील कुशल मनुष्यबळ प्रगतीपथावर येईल,' असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टर समूह यांच्यात गुरूवारी सामंजस्य करार करण्यात आला. सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि अरुण सातपुते यांनी स्वाक्षरी केल्या. उपमहापौर तथा क्लस्टरचे अध्यक्ष भूपाल शेटे म्हणाले, 'कोल्हापुरी चप्पलला 'जी.आय.' मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नवी पिढी या व्यवसायात येण्यासाठी उत्सुक नाही. या पार्श्वभूमीवर या कराराच्या आधारे बदल होईल.'

दरम्यान, विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या संकल्पनेतून साईप्रसाद बेकनाळकर यांनी साकारलेल्या 'शिवबा' या क्राफ्ट बुकचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाचा कोल्हापुरी चप्पल क्लस्टरसमवेत झालेल्या सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर आणि 'क्लस्टर'चे अरुण सातपुते यांच्यासह डावीकडून व्ही. टी. पाटील, नितीन चंद्रकांत देसाई, डॉ. ए. एम. गुरव, भूपाल शेटे, महेश काकडे, आदी उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 6 Jul 12, 2019
Powered by: erelego.com

# सिनेमानिर्मितीच्या २८ कौशल्यांचे शिक्षण



कोल्हापूर टाइम्स टीम

सिनेमानिर्मिती व्यवसायाने गेल्या काही वर्षांत आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कात टाकली आहे. सिनेमा निर्मितीच्या मागे २८ प्रकारच्या विविध कलाकौशल्यामध्ये निपुण असलेल्या मनुष्यबळाची सिनेइंडस्ट्रीला मोठ्या प्रमाणात गरज आहे. उपजत कलाकौशल्याला योग्य ज्ञानाची जोड मिळाली तर शिवाजी विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी सिनेक्षेत्रातील पडद्यामागच्या कौशल्यात प्रगती करू शकतात. याच संकल्पनेवर आधारीत सिनेक्षेत्रातील कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व मुंबईतील खालापूर येथील एनडीज् आर्ट वर्ल्ड यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व एनडीज् आर्ट वर्ल्डचे संचालक कलादिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांनी या करारपत्रावर स्वाक्षरी केली. शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि एनडीज् आर्ट वर्ल्ड यांच्यामध्ये विविध कौशल्य विकास व प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सामंजस्य करार झाला.



खालापूर येथील एनडीज् आर्ट वर्ल्डसमवेत सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्यासह कलादिग्दर्शक नितीन देसाई, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत (डावीकडून) वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, उपमहापौर भूपाल शेटे, अरुण सातपुते.

## शिवाजी विद्यापीठ-एनडीज् आर्ट वर्ल्ड यांच्यात 'एमओयू'

या कराराच्या उपयुक्ततेबाबत बोलताना देसाई म्हणाले, 'कलेचे शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमावर आधारीत असू शकत नाही. त्याला प्रात्यक्षिक, प्रयोग, नवकल्पना यांची जोड असावी लागते. त्यामुळेच या सामंजस्य कराराअंतर्गत सिनेक्षेत्रामध्ये आवश्यक असलेल्या २८ कलाकौशल्यांचा अभ्यासक्रम तयार करत असताना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देण्यात येणार आहे. यामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वयाची, किमान शिक्षणाची अट असणार नाही. उपजत कौशल्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर इंडस्ट्रीमध्ये असलेली मागणी यानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाला रोजगाराच्या संधी तर उपलब्ध होतीलच, मात्र त्यांच्यातून पुढे एखादा लघुउद्योजक तसेच व्यावसायिक सुद्धा निर्माण होईल, या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात येतील.'

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, '२८ प्रकारची कौशल्ये केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे आणि मनोरंजनाचे रुपांतर रोजगारात करण्याचे काम या माध्यमातून होणार आहे. 'जॉब-रेडी' मनुष्यबळ घडविण्याचे काम याद्वारे साध्य होईल.'

यावेळी उपमहापौर भूपाल शेटे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

लोकमत

## देवानंद शिंदे : क्लस्टरसमवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार

# कोल्हापुरी चप्पलसंबंधी आंतरराष्ट्रीय स्तरावर करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापुरी चप्पलला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर चप्पल क्लस्टरला सर्वतोपरी साहाय्य करील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केली.

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टर समूह यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी उपमहापौर भूपाल शेटे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि ज्येष्ठ कलादिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कोल्हापुरी चप्पल अत्यंत दर्जेदार आहे. या चप्पलला कालसुसंगत असे आधुनिक रूप प्रदान करण्यासाठी संशोधन, तंत्रज्ञान विकास, पणन, व्यवस्थापन आणि कौशल्यनिर्मिती या चार आघाड्यांवर विद्यापीठ सक्रियपणे मदत करील. त्या दृष्टीने हा सामंजस्य करार अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

उपमहापौर तथा क्लस्टरचे अध्यक्ष भूपाल शेटे म्हणाले, कोल्हापूर चप्पलच्या निर्मितीमध्ये सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या कारागिरांवर पारंपरिक स्वरूपाची अनेक बंधने आहेत. त्या बंधनांत तसेच अत्यंत वंचित स्थितीत राहून ते कोल्हापुरी चप्पलचा दर्जा आणि वैभव जपण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांच्यासाठी आणि कोल्हापुरी चप्पलला तिचे पूर्ववैभव मिळवून देण्यासाठी क्लस्टर प्रयत्नशील आहे. कोल्हापुरी चप्पलचा ब्रँड कर्नाटकात नेण्याचे काही लोकांचे प्रयत्न सुरु आहेत; त्यामुळे कोल्हापुरी चप्पलला जी. आय. मिळविण्यासाठीही आम्ही प्रयत्न करीत आहोत. या सर्व बाबींमध्ये विद्यापीठाकडून सहकार्य अभिप्रेत आहे. त्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा आहे.

यावेळी सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि 'क्लस्टर'चे अरुण सातपुते यांनी स्वाक्षऱ्या केल्या. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, व्ही. टी. पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, महेश चव्हाण, आदी उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नितीन चंद्रकांत देसाई, विलास नांदवडेकर. व्ही. टी. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, भूपाल शेटे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# कलाकौशल्यासाठी एनडीज आर्ट वर्ल्डसमवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व एनडीज आर्ट वर्ल्ड यांच्यामध्ये विविध कौशल्य विकास व प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सामंजस्य करार झाला.

याप्रसंगी सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एनडीज आर्ट वर्ल्डचे संस्थापक अध्यक्ष नितीन देसाई यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी उपमहापौर भूपाल शेटे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कौशल्ये केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे व मनोरंजनाचे रूपांतर रोजगारात करण्याचे काम या कराराच्या माध्यमातून होणार आहे. त्यातूनच पुढे कलेचे रूपांतर व्यवसायात करणे शक्य होणार आहे. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# कोल्हापुरी चप्पल क्लस्टरसमवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोल्हापुरी चप्पलला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर चप्पल क्लस्टरला सर्वतोपरी साहाय्य करील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टर समूह यांच्यात सामंजस्य करारावेळी ते बोलत होते. यावेळी उपमहापौर भूपाल शेटे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि ज्येष्ठ कलादिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमहापौर तथा क्लस्टरचे अध्यक्ष भूपाल शेटे म्हणाले, कोल्हापूर चप्पलच्या निर्मितीमध्ये सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या कारागिरांवर पारंपरिक स्वरूपाची अनेक बंधने आहेत. त्यांच्यासाठी आणि कोल्हापुरी चप्पलला तिचे पूर्ववैभव मिळवून देण्यासाठी क्लस्टर प्रयत्नशील आहे. यावेळी सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि अरुण सातपुते यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, महेश चव्हाण आदी उपस्थित होते.



**शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टर समूह यांच्यात सामंजस्य करार करताना डॉ. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, क्लस्टरचे अध्यक्ष भूपाल शेटे. सोबत नितीन देसाई आदी.**

**शिवबा क्राफ्ट बुकचे प्रकाशन**

या प्रसंगी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या संकल्पनेतून साईप्रसाद बेकनाळकर यांनी साकारलेल्या 'शिवबा' या क्राफ्ट बुकचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कला दिग्दर्शक नितीन देसाई आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हे क्राफ्ट बुक शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील प्रसंगांवर बेतलेले असून, गड-किल्ल्यांच्या निर्मितीसह अनेक अभिनव उपक्रम यात विद्यार्थ्यांसाठी आहेत.

# चित्रनगरीला ऊर्जितावस्था आणणार

## कलादिग्दर्शक नितीन देसाई; शिवाजी विद्यापीठासोबत सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. ११ : इमारती आणि कंपाऊंड बांधून चित्रनगरीचा विकास होणार नाही. चित्रनगरीला ऊर्जितावस्था आणण्यासाठी स्वतंत्र आराखडा बनवला आहे. याबाबत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी प्राथमिक चर्चाही झाली. या गोष्टींचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून शिवाजी विद्यापीठाबरोबर केलेला सामंजस्य करार याचाच एक भाग आहे. अशी माहिती प्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांनी दिली.

नितीन देसाई यांचा कर्जतला एन. डी. आर्ट स्टुडिओ आहे. हा स्टुडिओ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात आज सामंजस्य करार झाला. या अंतर्गत ५० एकरमधील या स्टुडिओमध्ये चित्रपट निर्मितीसाठी लागणाऱ्या विविध कौशल्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येईल. विद्यार्थ्यांबरोबरच कारागिरांनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीक्षेत्रामध्ये काम करायचे आहे. त्यांच्यासाठी हे प्रशिक्षण उपयोगी पडेल. याबरबोरच आज विद्यापीठाने कोल्हापूर चप्पल क्लस्टर समूहाशी करार केला. या अंतर्गत कोल्हापुरी चप्पल बनवणाऱ्या कारागिरांना अत्याधुनिक तंत्राद्वारे पारंपरिक चप्पल बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात येईल. यामुळे खुल्या अर्थव्यवस्थेच्या काळात जागतिक बाजारपेठेत कोल्हापुरी चपलेचा ब्रँड पोहचवण्यास मदत होईल. क्लस्टरचे अध्यक्ष अरुण सातपुते, उपमहापौर भूपाल शेटे यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

नितीन देसाई म्हणाले, 'चित्रपट निर्मितीमध्ये २७ कलांचा उपयोग केला जातो. या सर्व कलांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येईल. केवळ भिंती आणि कंपाऊंड उभारून चित्रनगरी विकसित होणार नाही. त्यासाठी इथे चित्रपट निर्मितीसाठी पूरक असणारे उद्योगही येथे उभारले पाहिजेत. यासाठी एक आराखडा मी बनवला असून पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी याबाबत चर्चाही झाली आहे. याचा पाठपुरावा माझ्याकडून सुरू आहे. कोल्हापूरच्या चित्रनगरीला ऊर्जितावस्था आणण्यासाठी मी प्रयत्नशील आहे.'

या वेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक महेश काकडे हे उपस्थित होते.

### कोल्हापूर शूज बनवणार

यावेळी उपमहापौर भूपाल शेटे म्हणाले, 'आम्ही बनवलेली फोल्डिंगची चप्पल जगभर विकली गेली. आता कोल्हापुरी शू बाजारात आणणार आहे. हे बूट सर्व प्रकारच्या कामासाठी वापरता येतील.'

### शिवबा क्राफ्टबुकचे प्रकाशन

यावेळी साईप्रसाद बेकनाळकर यांनी बनवलेले शिवबा या क्राफ्टबुकचे प्रकाशनही करण्यात आले. या पुस्तकातील चित्रांप्रमाणे किल्ला, बुरुज, तोफ असे विविध आकार बनवता येतात.

